प्रेमशलाकेवरून वाहून नेणे

प्रिय मित्रहो,

१९४० साली बाबूजी महाराजांनी पुस्तकांची एक मालिका लिहिली, ज्यामध्ये त्यांनी केंद्राकडे जाण्याच्या मानवाच्या आंतरिक प्रवासाचे वर्णन केले आहे. केंद्र – ती परम अवस्था, जी सृष्टिरचनेपूर्वी अस्तित्वात होती आणि सर्व गोष्टींचे निर्मितीस्रोत होती. त्यांनी त्या मार्गावरील अडथळ्यांचेदेखील वर्णन केले आहे आणि त्या अडथळ्यांवरील उपायही सांगितले आहेत. त्याहीपेक्षा आश्चर्यकारक ही वस्तुस्तिथी होती की ते किती सोपे आहे हे त्यांनी सांगितले. स्वतः मार्गदर्शक बनून, त्यांनी मोकळेपणाने उपाय सांगितले आणि सोप्या रेखाचित्रांचा वापर करून तो प्रवास समजून घेण्यास मदत केली. सर्वात गहन गूढ ज्ञान अचानकपणे संपूर्ण विश्वाला उपलब्ध झाले. बाबूजींनी त्यांच्याकडे आलेल्या सर्व संस्कृतींमधील, वयोगटातील आणि पार्श्वभूमीतील प्रत्येकाचे, कोणताही भेदभाव न करता, स्वागत केले. त्यांचे स्वप्न होते की आपण सर्वांनी प्रेमाने केंद्राकडे वाटचाल करावी आणि मानव म्हणून असलेल्या आपल्या सर्वोच्च क्षमतांचा शोध घ्यावा. प्रवासाचे शास्त्रोक्त पद्धतीने वर्णन करत, त्यांनी त्यांच्या वैयक्तिक अनुभवातून आपल्याला मार्गदर्शन केले आणि त्यांची रेखाचित्रे आणि सूचना अचूक, स्पष्ट आणि सोप्या आहेत.

त्या आकृत्यांपैकी एक आहे २३ वर्तुळे, जी आपण केंद्राकडे जात असताना आपल्या आंतरिक मार्गावरील विविध अवस्था किंवा स्तर दर्शवतात. आपण बाह्य परिघापासून सुरुवात करतो आणि त्या चक्रांमधून जातो, जी आपल्या सूक्ष्म शरीराची शरीररचना स्पष्ट करतात. बाबूजींनी ही चक्रे ज्या तीन मंडलांमध्ये आढळतात त्या मंडलांचे वर्णनदेखील केले आहे - हृदय मंडल, मनोमंडल आणि केंद्रीय मंडल. या सर्व केंद्राकडे जाणाऱ्या मार्गावरील अवस्था आहेत. तुम्ही बाबूजींच्या वर्णनाशी परिचित नसाल तर तुम्हाला या विषयावरील त्यांची - 'सत्योदय', 'राजयोगाचा प्रभाव' आणि 'अनंताकडे' ही पुस्तके वाचू शकता. त्याहीपेक्षा तुम्ही स्वतःच या प्रवासाचा अनुभव घेतला तर उत्तम. अर्थातच, जगाच्या नकाशावरील अक्षांश आणि रेखांश जसे प्रत्यक्षात नाहीत, त्याचप्रमाणे २३ वर्तुळे प्रत्यक्षात नाहीत. ते फक्त संदर्भबिंदू आहेत.



स्वातंत्र्य सोपान

या आंतरिक प्रवासात आपल्याला पुढे कसे नेले जाते? आपण प्रेमशलाकेवरून वाहून नेले जातो. परंतु मार्गावर अडथळे असतात. कोणते अडथळे असतात? त्यांच्यावर मात कशी करायची?

ज्याप्रमाणे प्रकाशाची किरणशलाका सर्वाधिक पारदर्शक काचेमुळेही विक्षेपित होते आणि विपर्यस्त दृश्य निर्माण होते, प्रेमाची किरणशलाकादेखील सर्वाधिक सूक्ष्म अवरणांमुळेही विक्षेपित होते. जर आवरणे नसती तर आपल्या सर्वांना प्रत्यक्ष केंद्रातून प्रवाहित होणाऱ्या विशुद्ध प्रेमाचा अनुभव आला असता आणि आपल्याला या आंतरिक प्रवासाची आवश्यकताच भासली नसती. परंतु, आपल्या मानवी अस्तित्वाचे स्वरूप असे आहे की आपल्याकडे आवरणे आहेतच आणि परिणामस्वरूप जसजसे आपण केंद्राकडे वाटचाल करू लागतो, आपल्याला आपल्या क्षमतेचा आणि सामर्थ्याचा विस्तार करीत क्रमाक्रमाने या २३ वर्तुळांमधून प्रवास करावाच लागतो.

ज्याप्रमाणे प्रकाशाची किरणशलाका सर्वाधिक पारदर्शक काचेमुळेही विक्षेपित होते आणि विपर्यस्त दृश्य निर्माण होते, प्रेमाची किरणशलाकादेखील सर्वाधिक सूक्ष्म अवरणांमुळेही विक्षेपित होते. जर आवरणे नसती तर आपल्या सर्वांना प्रत्यक्ष केंद्रातून प्रवाहित होणाऱ्या विशुद्ध प्रेमाचा अनुभव आला असता.

परिघामध्ये आणि केंद्रामध्ये अनेक आवरणे आहेत. बाहेरील पृष्ठभागावर आपल्या इच्छापूर्तीच्या ओढाताणीत, आपले प्रेम बाह्यकेंद्रित असते. उदाहरणार्थ, छोट्या मुलाचे प्रेम आईवडिलांकडे, खेळण्यांकडे, किशोरवयीन मुलाचे प्रणयाकडे, मैत्रीकडे, प्रौढाचे प्रेम कौटुंबिक जीवन, व्यवसाय, खेळ, छंद, मालकीच्या वस्तू आणि डिजिटल साधने याकडे आकर्षिले जाते. कधीकधी लोभ, मत्सर, हेवा, स्पर्धा आणि राग ताबा घेतात. तेव्हा प्रेम स्वामित्व गाजवणारे व स्वार्थी बनते. जेव्हा असे घडते, तेव्हा प्रेम सापळ्यात अडकते, तसेच जशी प्रकाशाची किरण शलाका आकाशगंगांमधील कृष्णविवरांमधून बाहेर पडू शकत नाही. हळूहळू, आपल्या साधनेद्वारे येणारी अधिक चांगली समज आणि योग्य विचारांनी, आपण या भावनांवर प्रभुत्व मिळवणे शिकतो आणि उच्च स्वरूपावर केंद्रित होतो. आपला परिवार, आपले काम इत्यादींवर प्रेम करीत असतानाच, आपण उच्च जाणीवदेखील विकसित करतो. भावनांवरचे प्रभुत्व आपल्याला पहिल्या पडावावर नेते. त्यानंतर, जसजसे आपण मार्गक्रमण करीत जातो, तसतसे विविध परिस्थितींमध्ये आपण स्वतःला सामोरे गेलेच पाहिजे.

हृदयातील पाच वर्तुळांपासून, आपण आपला हृदयातील प्रवास सुरू करतो. प्रत्येक परिस्थिती एका भावनिक आवरणाशी संबंधित असते आणि सुरुवात आपल्या इच्छांपासून होते. आपल्यात होणारे प्रगतिशील परिवर्तन म्हणजेच ही आवरणे काढून टाकणे.

आपण अनुभवत असलेली आवरणे वस्तुतः आपल्याला सुपरिचित असलेल्या गोष्टी असतात. उदाहरणार्थ, पती-पत्नी किंवा जोडीदाराच्या नातेसंबंधात आपण बहुधा एकमेकांना बंधनात अडकवतो. शेकडो जोडप्यांपैकी, क्वचित तीन किंवा चारच भाग्यवान जोडपी असतात, ज्यांना अस्सल प्रेम लाभलेले असते. बहुतेक सर्व स्वामित्व गाजवणारेच असतात. इतर अवरणांमध्ये आपल्या विश्वासप्रणालींचा जसे की आपल्या धार्मिक श्रद्धा यांचा समावेश असतो. या आपल्याला वेगळ्या श्रद्धा किंवा विचारसरणी असलेल्या लोकांविषयी पूर्वग्रह बाळगण्याकडे घेऊन जातात, मग त्या धर्माविषयी असोत, राजकारणाविषयी असोत किंवा विश्वासप्रणालीशी संबंधित असोत. त्यानंतर आपली तत्त्वे, जी आपल्याला फार प्रिय असतात, उदाहरणार्थ, प्रामाणिकपणा आणि न्याय. यापैकी अनेक तत्त्वे उदात्त आहेत, तरी जर आपण आपल्या या आवडींबद्दल दुराग्रही असू तर आपल्याला माफ करणे आणि सोडून देणे शक्य होणार नाही, त्याऐवजी आपण आपल्याला जे योग्य वाटते त्याबद्दल नेहमी झगडत राहू. यामुळे विपर्यास होतो - याचा शेवट कदाचित आपण लोकांचा तिरस्कार करण्यात होऊ शकेल - यामुळे प्रेमाची शलाका तिच्या केंद्राकडे जाण्याच्या गतिमार्गातून विक्षेपित होते.

हृदयातील पाच वर्तुळांपासून, आपण आपला हृदयातील प्रवास सुरू करतो. प्रत्येक परिस्थिती एका भावनिक आवरणाशी संबंधित असते आणि सुरुवात आपल्या इच्छांपासून होते. आपल्यात होणारे प्रगतिशील परिवर्तन म्हणजेच ही आवरणे काढून टाकणे.

लोकप्रिय संस्कृतीतील याचे उत्तम उदाहरण आहे स्टार वॉर्समधील ॲनाकीन स्कायवॉकर. ॲनाकीनमध्ये निवडक जेडाइंपैकी एक जेडाइ बनण्याची क्षमता होती, जो शक्तीचे संतुलन पुनर्स्थापित करू शकला असता. तो एक प्रेमळ आणि दयाळू युवक होता. परंतु, नंतर त्याच्यामध्ये त्याच्या प्रिय आईच्या आणि त्याच्या लाडक्या पॅडमेच्या मृत्यूमुळे निर्माण झालेल्या तीव्र संतापाबद्दल ओढ निर्माण झाली आणि त्यामुळे त्याचे शेवटी डार्थ वेडरमध्ये रूपांतर झाले.

अहंकार ही अस्तित्वाची काळी बाजू आहे. जितके आपण आपल्या अस्तित्वाच्या केंद्रातील प्रकाशाच्या स्रोतापासून दूर असू, तितकी ती गडद सावली लांब वाटते. अहंकाराने कशाचे किंवा कोणाचे समाधान होते? जेव्हा इतर लोक प्रखर विरोध करत असताना एखादा कोणीतरी आपल्याशी सहमती दर्शवतो, तेव्हा तो आपला सर्वात चांगला मित्र बनतो. का? याच्या अगदी विपरीत. जेव्हा एखादा आपला

खरोखर जवळचा असणारा कोणीतरी आपल्याशी पूर्णतः असहमत असतो, तेव्हा नेहमी आपण आपले संतुलन गमावतो.

अहंकारापेक्षा इच्छांना हाताळणे खूप सोपे आहे, कारण एकदा त्यांची पूर्तता झाली की संतृप्तीनंतर त्या पुन्हा उत्पन्न होणार नाहीत. कदाचित त्यांची पुनरावृत्ती होऊ शकते, परंतु त्याचा कालावधी मर्यादित असेल. त्याचप्रमाणे, अन्नाबद्दलची आणि इतर इंद्रियांच्या परिपूर्ततेची इच्छा बरीचशी नैसर्गिक असते. अहंकाराच्या बाबतीत मात्र विना उसंत सातत्य असते. अहंकार सत्ता आणि पद ... खरेतर जे काही त्याच्या अस्तित्वाला खतपाणी घालते, त्याच्यावर फोफावतो. हा गुण आपल्याला इतर प्राणीजगतापासून वेगळे करतो. ही गोष्ट जिच्यामुळे विकास होणे अभिप्रेत आहे, तीच चेतनेच्या विस्ताराच्याविरुद्ध काम करत आहे.

प्राणी आणि वनस्पती यांच्यामध्ये या पतनाचा धोका नसतो, परंतु पुढील सजग विकासाचा लाभदेखील त्यांना मिळत नाही. त्यांचा अहंकार अस्तित्वात नसल्यातच जमा असला तरी, प्राणी आणि वनस्पती यांच्यासारखे वागणे आपल्याला उन्नती मिळवून देणार नाही.

अमर्याद सागराशी एकरूप होऊन, अदृश्य दिव्यत्वाशी स्वतःची ओळख जोडून, केवळ आनंदी, हलके बनूनच आपण अहंकाराच्या अखंड मागण्या आणि ओझ्यातून स्वतःला मुक्त करू शकतो. जेव्हा आपण स्वतःला बाह्य जगाशी जोडून घेतो, तेव्हा आपण पूर्णपणे त्यामध्येच गुंतून पडतो, त्याला काही मर्यादाच नसते. हे म्हणजे एखादे जाळे निर्माण करून त्यामध्येच अडकून पडण्यासारखे आहे.

आपल्या प्राकृतिक किंवा इंद्रियजन्य इच्छांची पूर्तता करण्यासाठी बाह्य गोष्टींची गरज असते. आपण बाह्य गोष्टींवर अवलंबून असतो. ही निर्भरता आपल्याला इच्छांचे गुलाम बनवते. वाघ, म्हशीची किंवा हरणाची शिकार जगण्याच्या अंतःप्रेरणेने करतो. सिंहाकडे प्रजननासाठी त्याच्या सहा सिहिणींचा कळप असतो. हा निसर्ग आहे. नेमकेपणे सांगायचे तर बाह्य निसर्ग आहे. आपण रसगुल्ला, बिर्याणी किंवा पिझ्झा खाणे टाळू शकतो, परंतु अन्नाची गरज कधीच टाळू शकत नाही. एखाद्या व्यक्तीच्या अहंकाराची पूर्तता करण्याचे काय? अहंकार ईश्वरदत्त आहे का? तो स्वनिर्मित आहे. तो अदृश्य, आंतरिक विश्वातून उत्पन्न होतो.

तहान आणि भूक भागवण्याची आणि कामवासनेची पूर्तता करण्याची गरज आपण सहज समजू शकतो - त्या आवश्यक आहेत आणि निसर्गाच्या योजनेचा भाग आहेत. अहंकारदेखील निर्सगाची देणगी आहे का? जेव्हा पोट जड होते आणि दुखण्यास सुरुवात होते, तेव्हा तो आतून आलेला इशारा असतो की याहून अधिक अन्न त्रासदायक ठरणार आहे. अनावश्यक गोष्टींसाठी बहुतेकवेळा इशारा मिळतो. अहंकारदेखील अनावश्यक आहे आणि अनावश्यक गोष्टीची पूर्तता करणे वैयक्तिक आरोग्याच्या विरुद्ध आहे, मग ती शारीरिक असो, मानसिक, भावनिक अथवा आध्यात्मिक असो.

प्रत्येक वेळी जेव्हा मला एखाद्या गरजेवर आधारित ईमेल येते, तेव्हा मी एकतर त्याला उत्तर देतो किंवा फाईलला लावतो. मी जर प्रतिसाद दिला नाही तर ईमेल पाठवणारा पुन्हा ईमेल पाठवून विचारतो, “दाजी, तुम्ही माझ्यावर नाराज आहात का?” ते मला प्रतिसाद द्यायला भाग पाडतात आणि अशी आशा करतात की मी म्हणावे, “नाही, नाही, मी तुमच्यावर नाराज नाही.” अशा प्रकारची देवाणघेवाण अर्थहीन असते आणि संबंधित लोकांचा वेळ वाया घालवणारी असते. जे लोक अशा अहंकार कुरवाळण्यात आणि चोचले पुरवण्यात मग्न असतात, ते क्वचितच अंतरंगात खोलवर जाऊ शकतील. अहंकाराला नेहमीच बाहेरून कुरवाळले जाण्याची अपेक्षा असते, विशेषत: त्याच्याकडून जो तुमच्यासारखा आहे, त्याच प्रकारचा आहे किंवा ज्याचा तुम्ही खूप आदर करता.

त्याच प्रकारचे लोक का? भारतीय संसदेत सूट आणि टाय घालून काय उपयोग? कोण तुमचा हेवा करेल?

स्वामी विवेकानंदांसमोर किंवा रामकृष्ण परमहंसांसमोर हिऱ्याचा हार आणि सोन्याच्या जरीचा ब्लाउज घालून काय उपयोग? त्यांना हेवा वाटेल का? उलट, त्यांनी वाहवा न केल्याने, तुमचा अहंकार भुईसपाट होईल. तुमच्या केंद्रापासून तुम्हाला दूर नेणारी, अहंकार ही सर्वात बाहेरील सीमा आहे. त्या सर्वात बाहेरील परिसीमेवरून तुम्हाला तुमच्या हृदयाचे ऐकणे अवघड बनते. त्याऐवजी, तुम्ही इतरांच्या आणि त्यांच्या मतांच्या अधिक जवळ असता. अशी प्रवृत्ती आध्यात्मिक व्यक्तीसाठी विषासमान असते.

अहंकार नेहमी सामुदायिक गोष्टींशी जोडला जातो. उदाहरणार्थ, तुम्हाला कदाचित देशाभिमान वाटू लागेल, या विश्वासाने की तुमचा देश महान आहे. इतरांच्या जीवावर. शास्त्रज्ञ आणि आध्यात्मिक लोकदेखील संकुचित वृत्तीचे बनण्याची शक्यता असते, या विश्वासाने की केवळ त्यांचाच दृष्टिकोन योग्य आहे. “मला माहीत आहे. मीच बरोबर आहे.” हा रोग कदाचित आपण सामोरे जात असलेली सर्वात मोठी महामारी आहे. हे एक निर्णायक आवरण आहे, जे प्रेमाच्या शलाकेला विक्षेपित करते.

जितके अधिक आपण आपल्या श्रद्धांना, आपल्या तत्त्वांना आणि आपल्या पूर्वग्रहांना चिकटलेले असतो, तितके मोठे अडथळे प्रेमशलाकेला अडवत असतात आणि आपल्याला गंतव्यस्थानी पोहोचण्यापासून रोखत असतात. आपला सामुदायिक अहंकार विशेष धोकादायक असतो कारण तो आपल्याला जमाव मानसिकतेकडे घेऊन जातो. आपणास ही मानसिकता धार्मिक कट्टरतेमध्ये आणि जेव्हा समाजाचे राजकीयदृष्ट्या ध्रुवीकरण होते व ते द्वेष, हिंसा आणि कधीकधी युद्धाकडे घेऊन जाते तेव्हा निदर्शनास येते. अशा प्रकारच्या वातावरणात, आपल्या सभोवतालचे लोक, इतर दृष्टिकोन स्वीकारण्यास मदत करण्याऐवजी आपल्या स्वतःच्याच समजुती मजबूत करतात. आपण अधिकच संकुचित वृत्तीचे बनतो.

परंतु, आसक्ती आपली मित्रदेखील बनू शकते, आपल्याला विरुद्ध दिशेला, सर्वसमावेशकतेकडे नेऊ शकते. ही आसक्ती जेव्हा खरोखर प्रेममय असते तेव्हा हे घडते. तेव्हा आपली जाणीव विस्तृत होते आणि तो आध्यात्मिक प्रवास असतो. आपण आसक्तीबद्दल कसे शिकतो? अगदी सुरुवातीपासून गर्भाशयात आपल्या आईसोबत आपण तिचा अनुभव घेण्यास सुरुवात करतो. जसजसे आपण मोठे होऊ लागतो, आपण इतर लोकांना भेटतो, त्यांच्याबद्दल आपल्याला ओढ वाटू लागते. आपल्यामध्ये मुलांबद्दल ममता आणि आपल्या बरोबरीच्या लोकांबद्दल प्रेम निर्माण होते. आपल्याला मार्गदर्शन करणाऱ्या गुरुदेवांबद्दल, त्याचप्रमाणे वडिलधाऱ्यांबद्दल आपल्याला प्रेम, विश्वास आणि श्रद्धा वाटू लागते. ही सर्व आत्मियतेची निष्पत्ती आहे आणि जसजसा आपला आंतरिक प्रवास सुरू राहतो, त्यामध्ये वाढ व घट होत राहते. आपण या सर्व गोष्टींचा अनुभव घेतो, स्वतःला विचारतो, “कोणावर प्रेम करावे?” “कोणाशी सहयोग ठेवावा?” “कोणावर विश्वास ठेवावा?” इत्यादी. आत्मियता प्रेमामध्ये रूपांतरित होते आणि शेवटी शरणागतीच्या अवस्थेमध्ये विलीन होते. तेव्हाच आत्मियता परिपक्व होऊन भक्ती बनते.

आत्मियता प्रेमामध्ये रूपांतरित होते
आणि शेवटी शरणागतीच्या
अवस्थेमध्ये विलीन होते.
तेव्हाच आत्मियता परिपक्व होऊन
भक्ती बनते.

प्रेमाच्या शलाकेची गती प्रकाशाच्या गतीपेक्षा अधिक वेगवान असते, त्यामुळे जर आपण सर्व आवरणे काढून टाकू शकलो, तर आपण केंद्राजवळ अगदी क्षणभरातच पोहोचू. जेव्हा या आवरणांनी निर्माण केलेले अडथळे प्रेमशलाकेला केंद्रापासून दूर विचलित करतात, तेव्हा आपल्याला खूप त्रास होतो. पूर्वग्रह, मत्सर, हेवा, लोभ आणि राग यासारखी काही आवरणे इतकी प्रभावी असतात की त्या जमिनीखालील आण्विक कक्षासारखे काम करतात - त्या कशाचाही आत शिरकाव होऊ देत नाहीत. त्या प्रेमाच्या शलाकेला तिची जादू दाखवण्यापासून रोखतात.

अलीकडील काळात मला याची अधिकाधिक जाणीव होते आहे की, प्राचीन भारतीय परंपरेत यासंबंधित आपल्याला शिकवण्यासारखे खूप आहे, विशेषतः भक्तिसूत्रे. आपण सामान्यतः भक्तीचा अनुवाद “प्रेम आणि भक्ती” असा करतो, परंतु ती याहून अधिक मूलभूत आहे. ती एक जाणीव आहे, प्रत्येक गोष्टीशी हृदयाद्वारे जोडलेले असण्याची - आपली वैयक्तिक चेतना आणि दिव्य वैश्विक चेतना यांच्यामधील दुवा आहे. भक्तीअभावी, आपण करत असलेल्या

प्रत्येक विचार व कृतीमधून उत्साह व आनंद हे महत्त्वाचे घटक हरवलेले असतात, त्यामुळे त्यांना काही उद्देशच उरत नाही. भक्ती ही आपल्या आंतरिक प्रवासाची जीवनरेखा असते, ती आपल्याला प्रेमशलाकेस जोडून ठेवते. नेमकेपणाने सांगायचे झाले तर भक्ती प्रेमशलाकेस खतपाणी घालते.

भक्ती ही आपल्या आंतरिक प्रवासाची जीवनरेखा असते, ती आपल्याला प्रेमशलाकेस जोडून ठेवते. नेमकेपणाने सांगायचे झाले तर भक्ती प्रेमशलाकेस खतपाणी घालते.

अहंकार प्रेमाची नाही, केवळ वर्चस्वाची भाषा आणि व्यक्तिगत विजय जाणतो. अहंकारी माणसासाठी विनम्रतेची भाषा, अनामिकता आणि खुल्या हृदयाची लवचिकता अनोळखी असते, तो समजूच शकत नाही. केंद्राकडे जाण्याचा प्रवास क्रमाक्रमाने आपल्याला एका वर्तुळापासून पुढील वर्तुळाकडे, एका मितीतून दुसऱ्या मितीत घेऊन जातो आणि जर आपण त्याच्याशी जुळवून घेऊ शकलो नाही तर प्रत्येक नवीन वातावरणाशी अनुरूप होण्यासाठी आपल्याला संघर्ष करावा लागतो. याकरिताच ऋषीमुनी चारित्र्य विशुद्ध करण्याची, 'अखलाक' ची गरज असल्याचे सांगतात. त्यांना अनुभवातून समजले आहे की आध्यात्मिक प्रदेशातील (टोपोग्राफी) बदलणाऱ्या आंतरिक वातावरणाशी आपली वागणूक जुळवून घेणे आपल्यासाठी गरजेचे आहे आणि प्रेम ती तडजोड घडून येण्यास मदत करते. उदाहरणार्थ, जेव्हा आपण हृदय मंडलातील शांती, स्थिरता आणि भौतिक गोष्टीपासून मुक्तीचे दैवी स्थान असलेल्या चक्र दोनवर पोहोचतो, तेव्हा आपल्या प्रिय व्यक्तींवर ओरडणे योग्य आहे का? अशा प्रकारचे सक्तीचे वागणे दुसऱ्या चक्राच्या आंतरिक मितीशी जुळत नाही.

'अनंताकडे' मध्ये, बाबूजींनी प्रत्येक चक्रापासून पुढील चक्रापर्यंतच्या प्रगतीचे वर्णन केले आहे. हृदयातील पहिल्या चक्रावर, आपल्या ध्यानादरम्यान जी अवस्था गुरुदेवांनी आपल्याला प्रदान केली आहे, तिच्यात चैतन्य ओतून, त्या अवस्थेची संपूर्ण जाणीव करून घेण्यास त्यांनी सांगितले आहे, त्यानंतर तिला आत्मसात करावे, जेणेकरून आपण तिच्याशी एकरूप होऊ. या प्रक्रियेमुळे आपल्यामध्ये स्वाभाविकपणे अधिकाधिक ओढ निर्माण होते. दुसऱ्या चक्रावर, ते आपल्याला आठवण करून देतात की, आपली उत्कट भक्ती आपल्याला त्याच्या पुढील मितीमध्ये घेऊन जाते. आपण असे म्हणू शकतो की दुसऱ्या चक्रामध्ये आपल्याला दिली जाणारी पोहोच आपल्या

भक्तीच्या उत्कटतेच्या प्रमाणात असते. भक्ती – हा आत्मियतेचा अधिक सखोल स्तर आहे. तिसऱ्या चक्रामध्ये, आपण खऱ्या प्रेमाचा अग्नी अनुभवतो, ज्यामुळे दैवी कृपा आकर्षित होते आणि आपण प्रवासात पुढे मार्गक्रमण करतो. आत्मियतेचा हा सखोल अनुभव इतका शक्तिशाली असतो की तो प्रत्यक्ष केंद्राचा प्रतिसाद आकर्षित करतो. अशा तऱ्हेने, प्रेमशलाकेवरून वाहून नेले जात असताना, प्रत्येक मीती पूर्वीच्या मीतीवर उभारली जाते.

प्रेमाविषयी आपण आपल्या नातेसंबंधातून शिकतो. ते प्रेम शिकवणारी आपली प्रशिक्षणभूमी आहेत. आत्मियता लहान मुलांसाठी आणि परिवारातील सदस्यांसाठी ममता म्हणून व्यक्त होते आणि बरोबरीच्यांसाठी आपुलकी ही प्रेमात रूपांतरित होते, परंतु असेदेखील आहे की इथेच अहंकार मार्गात आडवा येतो. होऊ शकणारे विभाजन जर आपल्याला टाळायचे असेल तर आत्म अवलोकनाची सवय महत्त्वाची आहे. जेव्हा आपण प्रेमापासून दूर होतो तेव्हा हे घडते.

प्रेम निर्माण होण्यासाठी आत्मियता जरी एक आवश्यक पायरी असली तरी ती सापळादेखील ठरू शकते. जर एका विशिष्ट पातळीवर आपण बांधले गेलो, तर आपण तेथेच अडकून पडतो. उदाहरणार्थ, जेव्हा आपण फक्त कुटुंबावरच केंद्रित होतो, तेव्हा समाजापर्यंत, संपूर्ण मानवजातीपर्यंतच्या किंवा संपूर्ण सृष्टीपर्यंतच्या पुढील पातळीपर्यंत आपल्या प्रेमाचा विस्तार होऊ शकत नाही. जेव्हा आपल्या प्रेमाचा मार्ग चिंचोळा असतो, तेव्हा आपण सर्वांवर प्रेम करू शकत नाही. खरी भक्ती निर्माण होण्यासाठी, आपल्याला आपली प्रेम करण्याची क्षमता विस्तीर्ण करीत राहण्याची आणि त्याने संपूर्ण जगाला वेढून टाकण्याची आवश्यकता असते. ही हृदयाची खरी उदारता आध्यात्मिक साधनेचा परिणाम असते.

खरी भक्ती निर्माण होण्यासाठी, आपल्याला आपली प्रेम करण्याची क्षमता विस्तीर्ण करीत राहण्याची आणि त्याने संपूर्ण जगाला वेढून टाकण्याची आवश्यकता असते. ही हृदयाची खरी उदारता आध्यात्मिक साधनेचा परिणाम असते.

साधारणपणे, प्रगती अशा प्रकारे होत असते : आत्मियतेपासून आपुलकी, त्यातून प्रेम व त्यापासून श्रद्धा. श्रद्धा ही फार मोठी प्राप्ती आहे, जिथे खरी श्रद्धा शरणागतीमध्ये विकसित होते. आपण या सर्व क्रमाने येणाऱ्या स्थितींमधून जातो. परंतु पुढे काय होते? आपण कुठे पोचतो?

भक्तीचा उद्देश केवळ हाच आहे की ती प्रेमाच्या शलाकेवरून सहजतेने आणि विनासायास प्रवास करण्यास आपल्याला मदत करते, जेणेकरून आपण परमतत्त्वामध्ये लय होऊ शकू. लयावस्थेमध्ये, आपल्या इच्छांच्या, आपल्या भावनांच्या आणि आपल्या अहंकाराच्या अवरणांना दूर केले जाते, ज्यामुळे आपला मार्ग सुकर होतो. तुम्हाला कदाचित वाटू शकेल की आता आपण केंद्राजवळ पोहोचलो असू, परंतु अजूनही काही बाकी आहे. केवळ आता, लयावस्थेच्या स्थितीत पोहोचल्यावर, आपला वास्तविक प्रवास खऱ्या अर्थाने सुरू होतो! सरळ शब्दात सांगायचे तर, जेव्हा तुम्ही तुमच्या इच्छा सोडून देता, तेव्हा मुक्ती निश्चित होते; जेव्हा अहंकार गळून पडतो, तेव्हा ताबडतोब लयावस्था प्राप्त होते.

आता आपण केंद्रीय प्रदेशात प्रवेश करतो आणि यामध्ये सात वर्तुळे असतात, जी प्रकाशाची वर्तुळे म्हणून ओळखली जातात. विशुद्ध स्वरूपाच्या पराचेतनेचा अनुभव घेत, आपण पुढे मार्गक्रमण सुरू ठेवतो. या प्रदेशामध्ये, चेतना तिचे मूळ स्वरूप प्राप्त करते. हे वास्तविकतेचे क्षेत्र आहे, इच्छेच्या, भावनेच्या आणि अहंकाराच्या वर्तुळांपलीकडील. येथे आपण सूक्ष्म अस्तित्वाच्या विविध अवस्थांमधून अनस्तित्वाकडे जातो. केंद्रीय प्रदेशाची सुरुवात स्वयंचलिततेच्या स्थितीने होते – अशी सूक्ष्म जाणीव की सर्वकाही आपोआप घडते आहे. तेथे कोणत्याही क्रियेत "कर्तेपणाची" जाणीव नसते. हे स्वयंचलित्व विनासायास असते आणि निसर्गाशी समरूप असते.

साधारणपणे, प्रगती अशा प्रकारे होत असते : आत्मियतेपासून आपुलकी, त्यातून प्रेम व त्यापासून श्रद्धा.

पुढील स्थितीमध्ये, स्वयंचलित्वाची जाणीव नाहीशी होते. हे समजून घेण्याचा सर्वात सोपा मार्ग आहे, दैनंदिन जीवन जगत असताना गाढ झोपेच्या स्थितीत असल्याची कल्पना करणे. या अजाणतेपणाच्या स्थितीतील क्रिया ठसे निर्माण करत नाहीत. मानसिक स्तरावर विचारांमध्ये किंवा क्रियेमध्ये कोणतीही गुंतवणूक नसते.

पुढे, जसजसे प्रेमाची शलाका आपल्याला केंद्राच्या जवळ घेऊन जाते, तसतशी विशुद्ध व्यक्तित्व बनण्यासाठी, अजाणतेपणाची स्थिती आणखी परिष्कृत होते. सर्व मर्यादा निघून जातात, परंतु हा काही शेवट नाही. सुप्त गती अजूनही असते.

आपण केंद्राकडे आपले पोहणे सुरू ठेवतो. बाबूजी केंद्राचे वर्णन गतिहीन आणि “स्वत:मध्येच अनंत,” असे करतात, जिथे शुद्ध कुतुहल आणि उच्च प्रतीचा विस्मय आढळतो. हेच गतिहीन केंद्र, संपूर्ण सृष्टीसाठी जबाबदार असणारी सुप्त गती टिकवून ठेवते.

बाबूजी त्या प्रकाशाचेही वर्णन करतात जो केंद्रातून उत्सर्जित होतो, केंद्र प्रदेशाच्या बाहेरील टोकाकडे प्रवास करत एक “वर्तुळ” बनवतो. ते प्रकाश हा शब्द वापरतात परंतु असे म्हणतात की याचे वर्णन करण्यास खरेतर शब्दच नाही. कदाचित हा तो प्रकाश आहे जो केंद्र प्रदेशाच्या सात वर्तुळांना त्यांचे, “प्रकाशाची सात वर्तुळे” हे नाव देतो. तुम्हाला काय वाटते? आपल्याला माहीत आहे ते हे, की केंद्र प्रदेशामध्ये प्रवेश करण्यासाठी ते वर्तुळ ओलांडून जाण्याचा एकमेव मार्ग आहे प्रेमाची शलाका आणि त्यासाठी गुरुदेवांवर संपूर्ण अवलंबित्व आवश्यक आहे.

हृदयपूर्ण प्रार्थनेसह,

कमलेश
कान्हा शांती वनम

श्री कमलेश पटेल

यांच्या 66व्या जन्मोत्सवानिमित्त

28 SEPTEMBER 2021

heartfulness
advancing in love